**पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला**

# प्रेस नोट क्र.१६

**शेख कमरशाद शेख युसुफ वय ३० रा. साबरीया चौक, अकोट फाईल, अकोला तडीपार**

पोलीस स्टेशन अकोट फाईल, अकोला शहर हद्दीत राहणारा इसम **शेख कमरशाद शेख युसुफ वय ३० रा. साबरीया चौक, अकोट फाईल**, अकोला यांस अकोला, अमरावती, बुलढाणा व यवतमाळ जिल्हयातुन तडीपार केले आहे.

**शेख कमरशाद शेख युसुफ वय ३० रा. साबरीया चौक, अकोट फाईल**, अकोला याचे विरूध्द पोलीस स्टेशन अकोट फाईल, अकोला येथे गैरकायदयाची मंडळी जमविणे, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, शरिराविरूध्दचे गुन्हे करणे, घातक शस्त्र जवळ बाळगणे ईत्यादी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. सदर इसमाने आपल्या साथीदारांसह संगणमत करून तो अकोला शहरात दादागिरी करून सामान्य जनतेवर दहशत निर्माण करतो, सामान्य लोकानां शिवीगाळ करून मारहाण करीत असल्यामुळे त्यांचे विरूध्द जनते मध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तो काहीएक कामधंदा करीत नसुन त्याचे सोबत गुंडप्रवृत्तीचे लोक ठेवुन किरकोळ कारणावरून दंगा करण्याच्या सवईचा आहे, लोकांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण झाल्याने त्याच्या गुन्हेगारी कृत्यास आळा बसावा, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये व जनतेच्या मनातील भितीचे वातारण दुर व्हावे म्हणुन ठाणेदार पोलीस स्टेशन अकोट फाईल, अकोला यांनी नमुद इसमास अकोला, अमरावती, बुलढाणा व यवतमाळ जिल्हयातुन तडीपार करण्याकरीता प्रस्ताव तयार करून उप विभागीय दंडाधिकारी, अकोला यांचेकडे प्रस्ताव सादर केला. सदर इसमाविरूध्द दाखल असलेले व न्याय प्रविष्ट गंभीर स्वरूपाचे गुन्हे पाहुन या प्रकरणाचे चौकशी सहायक पोलीस अधीक्षक श्री. सुधीर हिरेमठ, अकोला शहर यांचेकडे सोपविली.

सहा्यक पोलीस अधीक्षक श्री. सुधीर हिरेमठ यांनी वरिल नमुद इसमाविरूध्द चौकशी करून यापुर्वी त्यांचे विरूध्द केलेल्या प्रतिबंधक कारवाईमुळे त्याचे विरूध्द कोणताही परिणाम दिसुन न आल्यामुळे त्याच्या समाविघातक कृत्यास आळा बसावा व नजिकचे काळात येणारे धार्मीक उत्सव शांतता व सुव्यवस्था कायम राहावी म्हणुन त्याला अकोला, अमरावती, बुलढाणा व यवतमाळ जिल्हयातुन दोन वर्षाचे कालावधी करीता तडीपार करण्याच्या शिफारसीसह उप विभागीय दंडाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर केला. त्या अनुषंगाने उप विभागीय दंडाधिकारी, अकोला यांनी आदेश पारित करून नमुद इसमास अकोला विभागातुन तडीपार केले आहे. श्री. पडघण, ठाणेदार, पोलीस स्टेशन अकोट फाईल, अकोला यांनी उप विभागीय दंडाधिकारी यांचे आदेशाची अंमलबजावणी करून **शेख कमरशाद शेख युसुफ वय ३० रा. साबरीया चौक, अकोट फाईल**, अकोला यास औरंगाबाद शहर येथे तडीपार केले आहे.

अकोला शहरातील कायदयाचा भंग करणा-या गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या आरोपींविरूध्द तडीपार करण्याची अकोला पोलीसांनी श्री.प्रविणकुमार पडवळ यांचे मार्गदर्शना खाली मोहीम सुरू केली आहे. त्या मुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणलेले आहे.

दिनांक : - ०३.०९.२०१०

पोलीस अधीक्षक, अकोला
करीता.

प्रती,

संपादक

. ........